दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १८३ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.४ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मोदींची राज्यातील पहिली प्रचार सभा शिंदे गटाच्या मतदारसंघात



**नागपूर (वृत्तसंस्था):** महाराष्ट्रात मोदींचीपहिली प्रचारसभा ही विदर्भातील रामटेक लोकसभा मतदारसंघात होत असून येथे भाजपचा नव्हे तर शिंदे गटाचा उमेदवार रिंगणात आहे. त्यामुळे मोदी यांनी या मतदारसंघाची निवड करण्यामागे नेमके कारण काय यावर राजकीय वर्तुळात तर्कवतिर्क लावले जात आहेत. लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात मतदान आहे.

यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात येत असून त्यांची पहिली जाहीर सभा ही रामटेक लोकसभा मतदारसंघातील कन्हान या गावी १० एप्रिलला होत आहे. विशेष म्हणजे रामटेकला भाजपचा उमेदवार रिंगणात नाही. तेथे शिंदे गटाचा उमेदवार आहे. या मतदारसंघाला खेटूनच नागपूर लोकसभा मतदारसंघ असून तेथे नितीन गडकरी हे पक्षाचे उमेदवार आहेत. पण तरीही मोदींनी नागपूर ऐवजी रामटेकची केलेली निवड अनेक चर्चेंना तोंड फोडणारी ठरली आहे.रामटेक हा सेनेचा बालेकिल्ला आहे. सेना(एकसंघ)-भाजपयुतीत हा मतदारसंघ सेनेच्या वाट्याला येत असल्याने येथून आतापर्यंत भाजप कधीच निवडणूक लढला नाही. सेनेत फूट पडल्याने भाजपने या मतदारसंघावर दावा करून बघितला पण, शिंदे यांनी तो फेटाळल्याने भाजपने शिंदे गटाला काँग्रेसमधून आयात केलेला उमेदवार ( राजू पारवे) दिला आहे. शिंदे गटाची उमेदवारी मिळेपर्यंत पारवे काँग्रेसनिष्ठ होते. त्यामुळे काँग्रेसवर टोकाची कठोर टीका करणाऱ्या मोदींना काँग्रेसमधून आयात केलेल्या उमेदवाराचा प्रचार करावा लागणार आहे, ही बाब अनेकांना खटकणारी ठरली आहे.पूर्व विदर्भ हा भाजपचा बालेकिल्ला असून पहिल्या टप्प्यात मतदान होणाऱ्या पाच पैकी तीन ठिकाणी भाजपचे व एका ठिकाणी मित्र पक्षाचे विद्यमान खासदार आहेत. २०१९ ते २०२४ या दरम्यान पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. सत्तेसाठी पक्ष फोडणे, मराठा आणि ओबीसींमध्ये वाद पेटवणे, बेरोजगारी, निष्क्रिय खासदार , न्टिइन्कम्बन्सी, वाढलेली महागाई, बेरोजगारी यामुळे केंद्रातील सरकार विरोधात प्रचंड संताप लोकांच्या मनात आहे. त्यामुळे महाराष्ट्रासह विदर्भातील सर्व जागांवर भाजपने लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामुळे फक्त ४८ जागा असलेल्या महाराष्ट्रात पाच टप्प्यात तर दहा जागा असलेल्या विदर्भात दोन टप्प्यात मतदान आहे. सर्वच जागांवर प्रचार करण्यास पुरेसा वेळ मिळावा म्हणून केलेली ही आखणी करण्यात आली असल्याची टीका विरोधी पक्षकाडून केली जात आहे.रामटेक हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. तेथील विद्यमान खासदार कृपाल तुमाने सलग दोन वेळा येथून निवडून आले. पक्ष फुटला तेव्हा ते शिंदे गटासोबत गेले. तिसऱ्यांदाही त्यांनाच उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा तुमाने यांना होती, पण भाजपच्या आग्रहामुळे शिंदे यांनी तुमाने यांना उमेदवारी नाकारली. मात्र सेनेतीलच इतरांना न देता काँग्रेसमधून आयात केलेले राजू पारवे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे तुमाने समर्थक नाराज आहेत, अशीच परिस्थिती वाशीम-यवतमाळ मतदारसंघात आहे.याचा फटका भाजपला बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी नागपुरात येऊन तुमानेंना उमेदवारी नाकारल्यावरून फुटीर गटाला लक्ष्य केले. रामटेक लोकसभा मतदारसंघात होणारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा फक्त त्या मतदारसंघासाठी नसून नागपूर व पूर्व विदर्भातील अन्य मतदारसंघ मिळून आहे. मोदींनी गावांना शहरासोबत जोडले, त्यांचा विकास केला. त्यामुळे सभास्थळ महत्वाचे नाही. पंतप्रधानांच्या सभेचा फायदा पूर्व विदर्भातील सर्व मतदारसंघांना होणार आहे..

## शिक्षकांना राजकीय पक्षात व संघटनेत काम करण्याचा अधिकार-आ.सुधाकर अडबाले

**चंद्रपूर । प्रतिनिधी**


जिल्हा परिषद व महापालिकेचे प्राथमिक शिक्षक असल्यास त्यांना सक्रीय राजकारणात भाग घेता येत नाही. मात्र, माध्यमिक, ज्युनिअर कॉलेज आणि सिनिअर कॉलेज शिक्षक असल्यास राजकारणात सक्रीय भाग घेता येतो. निवडणुकीला उभं राहता येते. प्रचारही करता येतो. त्यात कुणीही आडकाठी करु शकत नाही. दोघांच्याही सेवाशर्ती व कायदा वेगळा आहे. त्यामुळे शिक्षकांना राजकीय पक्षात व संघटनेत काम करण्याचा अधिकार आहे, अशी माहिती आमदार सुधाकर अडबाले यांनी दिली.

निवडणुकीच्या प्रचारात शिक्षकांना भाग घेता येणार नाही, अशा पद्धतीचे आदेश काही अधिकारी परस्पर देत असल्याच्या बातम्या येत आहेत. जिल्हा परिषदेचे कर्मचारी हे शासकीय कर्मचारी आहेत. ते सरकारी कर्मचारी असल्यामुळे त्यांच्यावर बंधन जरुर आहे. मात्र, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षकांना खुद्द डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानानेच निवडणुकीसंदर्भात स्वातंत्र्य आणि अधिकार दिला आहे. हे शिक्षक शासकीय किंवा निमशासकीय कर्मचारी नव्हेत. तर ते त्या - त्या अनुदानित शिक्षण संस्थांचे किंवा विनाअनुदानित शिक्षण संस्थांचे कर्मचारी असतात. त्यामुळे त्यांना कोणताही अधिकारी प्रतिबंध करु शकत नाही. तसे केल्यास ते राज्य घटनेतील तरतुदीशी विसंगत ठरेल. राज्य घटनेतील तरतुदीनुसार आणि महाराष्ट्र राज्य खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) कायदा व नियमावलीनुसार शिक्षकांना पूर्ण राजकीय स्वातंत्र्य आहे. राज्यघटनेच्या भाग ६, प्रकरण ३ अनुच्छेद १७१ (ग) नुसार माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा खालचा दर्जा नसलेल्या अशा त्या राज्यातील शिक्षण संस्थांमधील शिक्षकांना विधान परिषदेवर प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार देण्यात आला आहे, असेही आमदार अडबाले



यांनी म्हटले आहे.महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम १९७७ आणि नियमावली १९८१ मध्ये शिक्षकांना निवडणूक लढवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. प्रचार करणे, भाषण करणे, संदेश देणे याला कोठेही प्रतिबंध करण्यात आलेला नाही. निवडणुकीत प्रचार, प्रसार करणे, भाषण करणे, मॅसेज करणे, व्हॉटस्अपवर मॅसेज करणे कायद्यानुसार विहीत आहे. राज्य घटनेतील मुलभूत स्वातंत्र्याच्या अधिकारात अभिव्यक्ती स्वातंत्र्यही येते. त्यावर प्रतिबंध लादता येत नाही. मतदानाच्या दिवशी शिक्षकांना निवडणुकीचे काम करावे लागते ती सुद्धा घटनेने दिलेली जबाबदारी आहे. त्याचा अर्थ असा नव्हे की त्यांना राजकीय पक्षात काम करता येत नाही. मधुकरराव चौधरी, वसंत पुरके, प्रा. जावेद खान, प्रा. रामकृष्ण मोरे हे शिक्षकच होते. ते शिक्षणमंत्रीही झाले. शिक्षक म्हणून ते निवृत्तीपर्यंत कार्यरत होते. तेव्हा माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि सिनिअर कॉलेजच्या शिक्षकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला घटनात्मक अधिकार आणि राजकीय स्वातंत्र्य निर्भयपणे अनुभवले पाहिजे. कुणालाही घाबरता कामा नये, असे आमदार सुधाकर अडबाले यांनी सांगितले.

## फॉर्म भरून येत असलेल्या गाडीला अपघात एक गंभीर




**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव लोकसभेचा रामदास तडस यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी नाचणगाव येथून गेलेले भाजपचे पदाधिकारी वर्धेवरून परत येत असताना त्यांची कार क्रमांक एम एच ३२ ए एच ४३ ५५ ही गाडी वर्धा पुलगाव मार्गावरील मलकापूर शिवारात असलेल्या पुलावरून खाली कोसळली यामध्ये गाडीचा पूर्ण चुराडा झाला गाडीमध्ये बसलेले अरविंद नाकतोडे सुरेश हनुमंते किशोर नागतोडे गजानन उमक यांच्यापैकी किशोर नागतोडे यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली त्यांना तातडीने सावंगी रुग्णालयात हलविण्यात आले

## तहसील कार्यालयातील ३७ जप्त वाहनांचा होणार लिलाव

### अवैधरित्या रेती उत्खनन व वाहतुक करतांना जप्त

**चंद्रपूर । प्रतिनिधी**



अवैधरित्या रेती उत्खनन व वाहतूक करणाऱ्या एकूण ३७ वाहनांचा लिलाव तहसील कार्यालय चंद्रपूरतर्फे १० एप्रिल रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात येणार आहे. दंडाची रक्कम भरण्यास वाजवी संधी देऊनही वाहन मालकांनी रकमेचा भरणा न केल्याने सदर लिलाव करण्यात येत आहे.

लिलाव करण्यात येणारी वाहने ही अवैधरित्या रेती उत्खनन व वाहतूक करणारी असून तहसील कार्यालयामार्फत केलेल्या कारवाईत सदर वाहने जप्त करून त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली होती. वाहन मालकांना त्यांच्यावर ठोठावण्यात आलेल्या दंडाची रक्कम भरण्यास पुरेसा वेळही देण्यात आला होता. मात्र अद्यापपावेतो त्यांनी दंडाचा भरणा न केल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या तरतुदींना अधीन राहून सदर लिलाव प्रक्रिया करण्यात येत आहे. जप्त केलेल्या वाहनांची एकूण संख्या ३७ असून यात ६ ट्रक, २० ट्रॅक्टर, २ तीन चाकी ऑटो, ८ हाफटन व १ जेसीबी अशा वाहनांचा समावेश आहे. वाहन लिलावासंबंधी सविस्तर माहिती तहसील कार्यालय चंद्रपूरचे नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व माहिती तलाठी कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तरी इच्छुकांनी वाहन लिलाव प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन तहसिलदार चंद्रपूर यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

## काँग्रेस बाबासाहेबांप्रमाणे बाळासाहेबांनाही निवडून येऊ देत नाही-उपमुख्यमंत्री फडणवीस

**अकोला :** इतिहासामध्ये काँग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवडून येऊ दिले नाही. त्याचप्रमाणे अकोल्यातून बाळासाहेब आंबेडकर यांनाही काँग्रेस निवडून येऊ देत नाही, अशी घणाघाती टीका राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.

अकोल्यातील महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांचा अर्ज दाखल करण्यासाठी आले असता आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री तथा महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार अमोल मिटकरी आदींसह महायुतीचे लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित होते. पुढे ते म्हणाले, अडीच वर्षांपासून विकासाची धुरा अनुप धोत्रे यांनी हातामध्ये घेतली. त्यामुळे एकमताने अनुप धोत्रेंना मैदानात उतरवले. ही देशाची निवडणूक आहे. अनुप धोत्रे यांचे कमळाचे बटन दाबल्यानंतर ते मत नरेंद्र मोदींना भेटते. पंतप्रधान पदावर नरेंद्र मोदींना परत बसवण्यासाठी ही निवडणूक आहे.

आपण सकारात्मकतेने पुढे जात आहोत. पुढे बाळासाहेब येतील, काँग्रेसचा देखील उमेदवार राहील. आपल्याला काही करण्याची गरज नाही. इतिहास तपासून बघा, काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकरांना निवडून येऊ दिले नाही. अकोल्यामध्ये काँग्रेस बाळासाहेब आंबेडकरांना निवडून येऊ देणार नाही. त्यामुळे आपल्याला चिंता करण्याची गरज नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.मोदीजींच्या विकासासाठी व समर्थ भारत तयार करण्यासाठी सकारात्मकतेने मत मागायचे आहे. १० वर्षांत नरेंद्र मोदींनी २५ कोटी जनतेला गरिबी रेषेच्या वर आणले. प्रत्येक घटकाचा विचार करून त्याच्यापर्यंत विकास पोहोचवण्याचं कार्य नरेंद्र मोदी यांनी केले आहे. अर्थव्यवस्थेचा विस्तार केला. देशातील वंचितांचा विचार काँग्रेसने किंवा वंचित आघाडी नव्हे तर केवळ नरेंद्र मोदींनी केला आहे. संविधान बदलण्याच्या अफवा पसरवल्या जातात. मात्र, चंद्र, सूर्य आहे तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला कुणीही हात लावू शकत नाही. संविधानाची हत्या तर १९७५ साली काँग्रेसने केली होती. या नाटकबाजांची नाटकं आता चालणार नाही, अशी टीका देवेंद्र फडणवीस यांनी केली.

## भरदिवसा शहरातील पथदिवे सुरू; वरोरा नगर पालिकेचा भोंगळ कारभार

### प्रशासक काळात अनेक कामात गोलमाल?

वरोरा नगर पालिकेमध्ये मागील ३ वर्षापासून निवडणूक न झाल्याने प्रशासक काम करत आहे. या काळात शहरातील अनेक विकास कामात गोलमाल झाल्याची चर्चा आहे. रस्ता बांधकामातील अंदाजपत्रकाद्वारे स्टीलच्या बिलाची उचल करण्यात आली मात्र रस्ता प्रत्यक्षात रस्ता बांधकामात स्टीलचा वापरच करण्यात आला नसल्याचे बोलल्या जात आहे. नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावं लागत असताना नगर पालिका प्रशासक मात्र कंत्राटदाराशी मिलीभगत करत कमिशन एकच मिशन याप्रमाणे आपले काम करत आहे.त्यामुळे येणाऱ्या काळात नगर पालिकेच्या सर्व भोंगळ कारभाराची पोलखोल होणार असल्याची चर्चा आहे.

### दिवसा कामचुकार पणा,रात्र झाली की कंत्राटदारांसोबत घसा ओला?

प्रशासक काळात शहरात अनेक ठिकाणी घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. नागरिक आपल्या समस्यांबाबत वारंवार नगर पलिकेत चकरा मारत असतात मात्र येथील ढीम्म प्रशासन याकडे दुर्लक्ष करत कामचुकारपणा करतात मात्र रात्र होताच कंत्राटदरासोबत घसा ओला करण्यात नेहमी तत्पर असतात अश्या चर्चा सर्वसामान्य ऐकायला मिळत आहे.



**वरोरा । प्रतिनिधी**

शहरात रात्रीच्या वेळी लावले जाणारे पथदिवे बंद न करता दिवसाढवळ्या सुरु ठेऊन 'अंधेर नगरी चौपट राजा'चा नमुनाच वरोरा नगर पालिका प्रशासनाने पेश केला आहे. शहरात वेगवेगळ्या ठिकाणी दिवसा पथदिवे सुरू ठेवून राष्ट्रीय संपत्ती वीज आणि जनतेच्याच पैशांची उधळपट्टी गेले कित्येक दिवस सुरू आहे.शहरातील नागरिकांना अंधारात वळदळ करताना त्रास होय नये यासाठी शहरात वेगवेगळ्या ठिकाणी नगर पालिका प्रशासनातर्फे पथदिवे लावण्यात आले आहे. मात्र या पथदिव्याच्या माध्यमातून लाखो रुपयांची उधळपट्टी केल्या जात आहे. रात्रीला लावण्यात आलेले पथदिवे दिवसाढवळ्या नगर पालिकेच्या भोंगळ कारभारांना दर्शवत आपला उजेड पडताना दिसत आहे. दिवसाढवळ्या विजेचे दिवे सुरू असताना नगर पालिका प्रशासन ढिम्म आहे. विजेची नव्हे, तर नागरिकांच्याच पैशांची ही उधळपट्टी अनेक दिवसांपासून सुरू आहे. सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तानंतर पथदिवे चालू-बंद करण्याची जबाबदारी नेमकी कुणाची असा प्रश्न उपस्थित केला जात असून यात विजेची उधळपट्टी मात्र सर्रास सुरू आहे.

### चालू विद्युत जनरेटरचे वर्षभरापासून उभे मात्र अचानक गायब झाले कुठे ?

जुन्या नगर पालिका परिसरात गेला ३ वर्षापासून चालू स्थितीत असलेले विद्युत जनरेटर अचानक गायब झाले.याबाबत काही नागरिकांनी मुख्याधिकारी यांना विचारना केली असता आपल्याला याबाबत काही माहिती नसल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. नगर पालिकेची मालमत्ता असलेले विद्युत जनरेटर अचानक गायब झाल्याने आणि मुख्याधिकारी यांना याबाबत काही माहिती नसल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले होते. मात्र मिळालेल्या माहितीनुसार चालू असलेले विद्युत जनरेटर कचरा डेपोत बंद अवस्थेत ठेवण्यात आहे.त्यामुळे या जनरेटरची परस्पर विल्हेवाट तर लावण्यात येणार नाही ना अशी शंका व्यक्त केल्या जात आहे.

सह्याद्रीचा राखणदार



# नाटो- नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन !

**नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन- नाटो यालाच नॉर्थ अटलांटिक अलायन्स देखील म्हणतात. २७ युरोपियन देश, २ उत्तर अमेरिकन देश आणि १ यांच्यातील आंतरसरकारी लष्करी युती आहे. ही संस्था दि.४ एप्रिल १९४९ रोजी स्वाक्षरी केलेल्या उत्तर अटलांटिक कराराची अंमलबजावणी करते. सदर ज्ञानवर्धक माहिती श्री एन. के. कुमार हे देत आहेत... संपादक.**

नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन किंवा नाटो ही जगातील २९ देशांचा सहभाग असलेली एक लष्करी संघटना आहे. नाटोची स्थापना दि.४ एप्रिल १९४९ रोजी १२ राष्ट्रांनी मिळून केली. त्याचे मुख्यालय बेल्जियमची राजधानी ब्रसेल्स येथे आहे. इ.स.२०१७ मध्ये मोंटेनेग्रो हा देश नाटोमध्ये सहभागी होऊन त्याची सदस्य संख्या २९ झाली व त्यानंतर सन २०२०मध्ये उत्तर मॅसिडोनियाच्या प्रवेशाने ही संख्या ३० झाली आहे. नाटो एक सामूहिक सुरक्षा प्रणाली तयार करते, ज्याद्वारे त्याचे स्वतंत्र सदस्य देश कोणत्याही बाह्य पक्षाच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी परस्पर संरक्षणास सहमती देतात. नाटोचे मुख्यालय ब्रुसेल्स, बेल्जियम येथे आहे; तर अलायड कमांड ऑपरेशन्सचे मुख्यालय बेल्जियमच्या मॉन्सजवळ आहे. नाटो कमांडर त्याच्या अधीनस्थ कमांडर्सना ऑपरेशनल प्लॅन्स, ऑपरेशनल ऑर्डर्स, रणनीतिक दिशा वा फ्रॅगमेंटल ऑर्डर्स आणि इतरांच्या स्वरूपात आदेश जारी करू शकतात. प्रतिबद्धतेचे संयुक्त नियम पाळले पाहिजेत व सशस्त्र संघर्षाच्या कायद्याचे नेहमी पालन केले पाहिजे. ऑपरेशनल रिसोर्सेस राष्ट्रीय कमांड अंतर्गत राहतात, परंतु ते तात्पुरते नाटोमध्ये हस्तांतरित केले गेले आहेत. जरी या राष्ट्रीय युनिट्स, अधिकार हस्तांतरणाच्या औपचारिक प्रक्रियेद्वारे, नाटो कमांडरच्या ऑपरेशनल कमांड आणि नियंत्रणाखाली ठेवल्या गेल्या आहेत, तरीही ते त्यांचे राष्ट्रीय वैशिष्ट्य गमावत नाहीत. सीडीएससारख्या वरिष्ठ राष्ट्रीय प्रतिनिधींना तथाकथित लाल-कार्डधारक म्हणून नियुक्त केले जाते. कॅव्हेट्स हे राष्ट्रानुसार नाटो कमांडर्सनी विचारात घेतले पाहिजेत, असे निर्बंध आहेत.

आता कोणी असाही प्रश्न करू शकेल की, भारत नाटोचा सदस्य आहे का? त्यास उत्तर असे मिळेल की, या संघटनेचे सदस्यत्व खुले आहे. युरोपीय देश उत्तर अटलांटिक प्रदेशात सुरक्षेला चालना देण्यासाठी नाटोचे सदस्य स्वीकारू शकतात. संघटनेची व्याप्ती वाढवण्यासाठी या संघटनेने सदस्यत्वाची दारे बिगरयुरोपीय देशांनाही खुली केली आहेत. यामुळेच अल्जीरिया, इस्रायल, जॉर्डनसह काही बिगरयुरोपीय देश त्याचे सहयोगी आहेत. मात्र आजपर्यंत तरी भारतदेश नाटोचा सदस्य किंवा सहयोगी झालेला नाही. भारत नाटोचा सदस्य का नाही? यासंदर्भात अनेक विचारप्रवाह आहेत. नाटो संघटनेच्या कलमांनुसार सदस्य राष्ट्रावर हल्ला, हा नाटोवर म्हणजे पर्यायाने सर्व सदस्य राष्ट्रांवर हल्ला मानला जातो. त्याचे सदस्य देश एकत्र येऊन संबंधित देशावर- हल्ला करणाऱ्या देशाविरोधात संयुक्तपणे लष्करी कारवाई करू शकतात. भारत नाटोचा सदस्य झाला तर पाकिस्तान आणि चीनला भारतावर आक्रमण करण्यापूर्वी अनेकदा विचार करावा लागेल. कारण भारताला नाटो सदस्य राष्ट्रांची ताकद उपलब्ध होऊ शकते. मात्र त्याचवेळी नाटोचा सदस्य झाल्यास भारतीय लष्करावर बोजा पडेल. अमेरिका नाटोचा महत्त्वपूर्ण सदस्य आहे. अमेरिका आणि रशिया यांच्यातील संबंध ताणलेले आहेत. अशा परिस्थितीत भारत नाटोचा सदस्य झाला तर अमेरिका आणि रशिया यांच्या कात्रीत सापडण्याची शक्यता आहे.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष- ७१३२७९६६८३.

स्थापनेपासून नवीन सदस्य राष्ट्रांच्या प्रवेशामुळे युती मूळ १२ देशांवरून ३०पर्यंत वाढली आहे. दि.२७ मार्च २०२० रोजी नाटोमध्ये जोडले जाणारे सर्वात अलीकडील सदस्य राष्ट्र उत्तर मॅसेडोनिया होते. त्यात सद्या बोस्निया आणि हर्जेगोविना, जॉर्जिया आणि युक्रेन इच्छुक सदस्य म्हणून सहभागी आहेत. त्याच्या शांतता कार्यक्रमात अतिरिक्त वीस देश सहभागी होतात, पंधरा इतर देश संस्थागत संवाद कार्यक्रमात सहभागी होतात. सन २०२०मध्ये सर्व नाटो सदस्यांचा एकत्रित लष्करी खर्च जागतिक नाममात्र एकूण ५७ टक्केपेक्षा जास्त आहे. सदस्यांनी मान्य केले की सन २०२४पर्यंत त्यांच्या जीडीपीच्या किमान २ टक्केपर्यंत लक्ष्य संरक्षण खर्च गाठणे किंवा राखणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. नाटो ही तीस सार्वभौम राष्ट्रांची युती आहे, परंतु युतीमधील सहभागामुळे त्यांचे वैयक्तिक सार्वभौमत्व प्रभावित होत नाही. नाटोकडे संसद नाही, कायदे नाहीत, अंमलबजावणी नाही आणि वैयक्तिक नागरिकांना शिक्षा करण्याचा अधिकारही नाही. सार्वभौमत्वाच्या या अभावाचा परिणाम म्हणून नाटो कमांडरची शक्ती आणि अधिकार मर्यादित आहेत. नाटो कमांडर अशा गुन्ह्यांना शिक्षा देऊ शकत नाहीत. जसे की, कायदेशीर आदेशाचे पालन करण्यात अयशस्वी, कर्तव्यात दुर्लक्ष किंवा वरिष्ठ अधिकाऱ्याचा अनादर. नाटो कमांडर्स नमनाची अपेक्षा करतात, परंतु काहीवेळा त्यांना त्यांच्या इच्छा किंवा योजना ऑपरेटर्सच्या अधीन करणे आवश्यक आहे. जे स्वत: युसीएमजे सारख्या सार्वभौम आचारसंहितेच्या अधीन आहेत. प्रिस्टिना विमानतळावर केएफओआरच्या कारवाईवरून जनरल सर माइक जॅक्सन आणि जनरल वेस्ली क्लार्क यांच्यात हाणामारी झाली.

भारताने रशियाशी चांगले संबंध प्रस्थापित केले आहेत. भारत-अमेरिका संबंध आणखी दृढ झाल्यास रशियाबरोबरच्या संबंधात बाधा येऊ शकते. त्याच धर्तीवर भारत-रशिया संबंध आणखी घट्ट झाल्यास अमेरिकेची खप्पा मर्जी होऊ शकते. लष्करी उपकरणांसाठी भारत रशियावर अवलंबून आहे. रशियाबरोबरचे संबंध दुरावल्यास रशिया-चीन भारताविरुद्ध एकत्र येण्याचा धोका संभवतो. तसे होणे भारतासाठी योग्य नाही. नाटोच्या कलमांनुसार सदस्य राष्ट्रावर हल्ला, हा बाकी देशांवरही हल्ला मानला जातो. अशा परिस्थितीत भारताचे एखाद्या गैर नाटो देशाशी चांगले संबंध असतील, परंतु त्या देशाने नाटो सदस्य राष्ट्राविरुद्ध युद्ध पुकारले, तर भारताला इच्छा नसूनही मित्र राष्ट्राविरुद्ध कारवाई करावी लागेल. भारतीय संदर्भात नाटोसारख्या संघटनाचे सदस्यत्व सार्वभौमतेला आव्हान मानले जाते. देशात याचा विरोध होऊ शकतो. नाटोचे सदस्यत्व स्वीकारल्यास भारताला जगभरातील विविध संघर्षांमध्ये उतरावे लागेल. यामध्ये आपल्या लष्कराची जीवितहानी होऊ शकते. या विविध कारणांमुळे भारत नाटोचा सदस्य नाही. काही अभ्यासकांचे मत असे आहे, की नाटो या संघटनेचा सदस्य होऊ पाहणारा देश उत्तर अटलांटिक प्रदेशातील म्हणजे उत्तर अमेरिका आणि युरोप या दोन खंडातील देश असायला हवा, असा निकष आहे. भारत भौगोलिकदृष्ट्या या प्रदेशातील नसल्याने त्याचा सदस्य होऊ शकत नाही. मात्र भारत या संघटनेशी आणि सदस्य देशांशी असलेले लष्करी, आर्थिक आणि राजनैतिक संबंध अधिकाधिक घट्ट करू शकतो. त्यातल्या त्यात त्यातील फ्रान्स, ब्रिटन, अमेरिका आदी देशांशी भारताचे चांगले संबंध आहेतच, ही तर म्हणावी लागेलच की, फारच मोठी जमेची बाजू!

!! विश्व नाटो स्थापना दिनानिमित्त सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# महात्मा फुले युवा मंच जयंती उत्सव अध्यक्षपदी सयाजी बनसोडे यांची निवड

**सांगोला । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंती निमित्त औचित्य साधून महात्मा फुले युवा मंच लक्ष्मीदहिवडी अध्यक्षपदी सयाजी बनसोडे यांची सर्वानुमते निवड झाली असल्याचे माहिती महात्मा फुले युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष अनिल बनसोडे यांनी माहिती दिली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ११ एप्रिल रोजी जयंती उत्सवाच्या आयोजनासाठी सिद्धनाथ मंदिर येथे मीटिंग आयोजित केली होती, या बैठकीत ११ एप्रिल २०२४ साठी अध्यक्षपदी सयाजी बनसोडे,उपाध्यक्षपदी मोहन वाघमारे,खजिनदारपदी गणेश बनसोडे,कार्यवाहक सुरेश टाकळे,मिरवणूक प्रमुख दगडू माळी यांची बिनविरोध निवड



करण्यात आली,या जयंती उत्सवामध्ये प्रतिमापूजन, सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यान, रक्तदान शिबिर,मोफत डोळे तपासणे आरोग्य शिबिर, विविध कार्यक्रमाने जयंती उत्साहात पाडली जाते.महात्मा फुले युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष अनिल बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली, त्यावेळी विद्यमान ग्रामपंचायत सदस्य प्रमोद बनसोडे मा. ग्रामपंचायत सदस्य सदस्य हनुमंत शिरसागर, दत्तात्रय बनसोडे, बाळासाहेब बनसोडे,विठ्ठल टाकळे,संतोष वाघमारे, अंकुश बनसोडे,मच्छिंद्र बनसोडे,रामचंद्र बनसोडे,नितीन वाघमारे,श्रीमंत बनसोडे,नितीन टाकळे, महेश बनसोडे,तुषार बनसोडे,सुहास शिरसागर,दिनेश नवले,नागनाथ बनसोडे, रोहित बनसोडे,सोमनाथ बनसोडे,नितीन बनसोडे. स्वप्निल बनसोडे, तानाजी बनसोडे,प्रतीक बनसोडे, प्रथमेश बनसोडे, वैभव हेरकळे,आदींच्या उपस्थितीमध्ये मीटिंग पार पडली. तर आभार किशोर वाघमारे यांनी मानले.

# साक्षी दीनानाथ रणदिवे हिने गोल्ड व सिल्वर मेडल पटकावले

**सांगोला । प्रतिनिधी**

शोटोकॉन स्पोर्ट्स कराटे डेव्हलपमेंट असोसिएशन व शाओलीन वर्ल्ड मार्शल आर्ट इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यादेवी होळकर सभागृह सांगोला येथे झालेल्या ओपन स्टेट कराटे कॉम्पिटिशन मध्ये मातोश्री गिरीजाबाई ढोबळे पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालय सांगोला मधील इयत्ता आठवी मधील विद्यार्थिनी साक्षी दीनानाथ रणदिवे हिने कता या प्रकारामध्ये गोल्ड व कुमिते फाईट या प्रकारामध्ये सिल्वर मेडल पटकावले साक्षी रणदिवे हिला वाघमारे सरांच्या कराटे क्लासेस मधून कराटे प्रशिक्षक सुनील वाघमारे सर व कराटे प्रशिक्षिका श्रावणी वाघमारे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले तिच्या यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने तिचा



सत्कार आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्राथमिक विभागाच्या प्रमुख वैशाली शिंदे ,माध्यमिकचे मुख्याध्यापक दिगंबर कानगुडे ,डी. एल. एडविभाग प्रमुख स्वाती पाटोळे बीएड विभाग प्रमुख शितल गयाळी,बीएड कॉलेजचे प्राचार्य साधू गरंडे, विद्यालयाच्या समन्वयिका अर्सिका खतीब ,डीएड कॉलेजचे प्राचार्य व स्थानिक व्यवस्थापक सर्फराज खतीब सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी साक्षीचे कौतुक केले व तिच्या पुढील कार्यासाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या

# गरिबांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची ‘मोदी गॅरंटी’-ना.मुनगंटीवार

## ओबीसी, एससी-एसटी, क्रांती दलाचा राज्यस्तरीय कार्यकर्ता मेळावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गेल्या दहा वर्षांत निराधार, वंचित, शेतकरी, महिलांसाठी विविध योजना केंद्र सरकारने आणल्या. या माध्यमातून उपेक्षित वर्गाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची आणि देशाचा सर्वांगीण विकास साधण्याची ‘मोदी गॅरंटी’ सन्माननीय पंतप्रधानांनी दिली आहे, असे प्रतिपादन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. राष्ट्रगौरव पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातच देश विश्वगुरू होण्याच्या दिशेने वाटचाल करणार आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

चंद्रपूर येथील शकुंतला लॉनमध्ये मंगळवार, २ एप्रिल रोजी राष्ट्रीय ओबीसी, एससी, एसटी, क्रांती दल महाराष्ट्र राज्य कार्यकर्ता मेळावा व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सुधीर



मुनगंटीवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या कार्यक्रमाला ओबीसी, एससी, एसटी, क्रांती दलाचे ॲड. राजेंद्र महाडोळे, माधव कोहळे, रंजना पारशिवे, राजू बल्लूरवार, धर्माजी मेश्राम, गणेश आत्राम, सुहास काळे, लक्ष्मीकांत लोळगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. राजेंद्र महाडोळे हे सर्वजातीसमुहाचे सक्षम नेतृत्व असून त्यांनी वंचित, दीनदुर्बलांना एकत्रित करण्याचे काम केले आहे. त्यांनी जनतेचा विकास आणि मोदी गॅरंटीच्या आधारावर मनापासून दिलेला हा पाठिंबा नक्कीच ही लोकसभा निवडणूक जिंकून देईल, असा विश्वास मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

# सोलापुरात अग्निसुरक्षा वाऱ्यावर; गरज २६ अग्निशमन केंद्रांची,प्रत्यक्षात पाचच

**सोलापूर** - शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असून उंच इमारती उभ्या राहत आहेत. त्या तुलनेत महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडे आग आटोक्यात आणण्यासाठी अपुरी साधने व मनुष्यबळाचा अभाव आहे. केंद्र सरकारच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या नियमानुसार २६ अग्निशामक केंद्रांची गरज असताना पाच प्रत्यक्षात पाच केंद्रे अस्तित्वात आहेत. त्यामुळे एका अग्निशमन केंद्रावर अडीच लाख लोकसंख्येचा भार आहे.



शहरात आगीच्या घटना, भिंत पडणे यासह विविध दुर्घटना घडल्यानंतर पहिला कॉल अग्निशामक दलाला केला जातो. महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या केंद्रांची संख्या केवळ पाच आहे. केंद्र सरकारच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीच्या नियमानुसार शहराची लोकसंख्या आणि हद्दीनुसार किती अग्निशामक केंद्रे असावीत याचे निकष दिले आहेत.त्यानुसार शहराच्या पहिल्या एक लाख लोकसंख्येसाठी एक, तर त्यापुढील प्रत्येक ५० हजार लोकसंख्येसाठी एक केंद्र असावे. तर दुसऱ्या निकषानुसार १० किलोमीटरच्या हद्दीत एक केंद्र असे नमूद आहे. दाट लोकवस्तीत २० टक्के केंद्राची वाढ आणि धोका असलेल्या भागात आणखी काही केंद्रे उभारण्याचाही निकष आहे. त्यामुळे वाढत्या लोकसंख्येच्या निकषानुसार व नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेला आणखी किमान २१ केंद्रे उभारावी लागणार आहेत.

# हिंगोलीत दगा-फटका केला तर नांदेडमध्ये भाजपाचा उमेदवार पाडूत,शिंदे सेनेचा भाजपाला नांदेडसाठी इशारा

**नांदेड । प्रतिनिधी**

हिंगोली लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेच्या शिंदे गटाचे उमेदवार हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर महायुतीतील घटकपक्ष असलेल्या भाजपाकडून त्यांच्या उमेदवारीला प्रखर विरोध केला जात आहे. ही जागा भाजपला सोडण्याची मागणी होत आहे. यासाठी हिंगोली जिल्ह्यातील भाजपच्या आमदारांनी सोमवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नांदेड विमानतळावर भेट घेऊन हिंगोली लोकसभा मतदारसंघातील उमेदवार बदलण्याच्या मागणी संदर्भात फडणवीस यांच्याशी चर्चा केली. या पार्श्वभूमीवर सोमवारी नांदेड येथे शिवसेनेच्या शिंदे गटाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. हिंगोली मध्ये दगा- फटका केला तर नांदेडमध्ये आम्ही तुमचा उमेदवार पाडूत असा इशारा या बैठकीत देण्यात आला.

बैठकीला जिल्हाप्रमुख आनंदराव बोंढारकर, उमेश मुंडे, गंगाधर बडूरे, तसेच शेतकरी सेनेचे प्रदेश कार्याध्यक्ष प्रल्हाद इंगोले, अशोक उमरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. हिंगोली मतदारसंघात भाजपाकडून युतीधर्म पाळला जात नसल्याच्या तक्रारी येत आहेत. हेमंत पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांच्या उमेदवारीला भाजपाकडूनच विरोध केला जात आहे, या अनुषंगाने हिंगोली लोकसभा मतदारसंघातील वातावरण प्रदूषित झालेले आहे, हे बिघडलेले वातावरण सुधारा अन्यथा नांदेड लोकसभा मतदारसंघात प्रतापराव पाटील चिखलीकर यांना आम्ही पाडण्याची व्यवस्था करू. सोबत घेऊन शिवसेनेला संपविण्याचे काम भाजपा करीत आहे असा आरोप करताना सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या नीतीवर हल्लाबोल केला. गेल्या दोन वर्षात शासकीय कमिट्या केल्या नाहीत. सेनेच्या पदाधिकाऱ्यांना कुठलाही निधी देण्यात आला नाही. त्यांना मान सन्मान मिळत नाही असा आरोप पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला. आमच्या पाठीत खंजीर खुपसू नका, समोरून वार करा असे म्हणत पदाधिकाऱ्यांनी भाजपला याद राखा विधानसभेच्या निवडणुका पुढे आहेत असा इशारा दिला आहे. हेमंत पाटील यांच्या ऐवजी दुसरा उमेदवार देण्याच्या खटाटोपी भाजपाकडून सुरू आहेत. हेमंत पाटील यांची उमेदवारी बदलल्यास नांदेड जिल्ह्यातील



सर्व पदाधिकारी राजीनामा देतील अशी माहिती आनंदराव पाटील बोंढारकर यांनी यावेळी दिली. आम्हाला युतीची पर्वा नाही असेही ते म्हणाले. याबाबत मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना कार्यकर्त्यांच्या भावना कळविणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भाजपच्या सर्वेक्षणाचा बागुलबुवा करून हेमंत पाटील यांना विरोध सुरू असल्याचे प्रल्हाद हिंगोली यांनी सांगितले. मात्र या बैठकीला शिवसेना उत्तरचे शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार बालाजी कल्याणकर यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवत होती. एकंदरीतच हिंगोली मतदारसंघातील उमेदवारीचा प्रश्न असताना त्याचे पडसाद मात्र शेजारच्या नांदेड जिल्ह्यातील शिवसेनेवर कोणत्या कारणामुळे पडत असावेत याची मात्र शहरात चर्चा चालू होती. महायुतीमध्ये पाडापाडीचे राजकारण चांगलेच रंगणार असल्याची शक्यता या बैठकीमुळे निर्माण झालेली आहे.

**हेमंत पाटलांनी विषयी हिंगोली मध्ये नाराजीचा सूर ?**

पाच वर्षांपूर्वी नांदेड वरून थेट हिंगोली मतदारसंघात उडी मारून विजयी झालेले खासदार हेमंत पाटील यांना हिंगोलीतून पुन्हा दुसऱ्यांदा उमेदवारी मिळालेली असली तरी त्यांच्या उमेदवारीवरून हिंगोली मतदारसंघांमध्ये भाजपा व शिवसेनेमध्ये धुमशान सुरू आहे. त्यामुळे त्यांना स्वपक्षीयांसोबत आघाडीतील घटक पक्षांनीही त्यांच्या उमेदवारीला विरोध केल्यामुळे महायुतीतील नेत्यांची नाराजी दूर करावी लागणार आहे. त्यानंतरच त्यांना मतदारांच्या दरबारात जावे लागणार आहे. खासदार हेमंत पाटील यांची महायुतीतील नेते व कार्यकर्त्यांशी तुटलेली नाळ व मतदारांशी राहिला नसलेला संपर्क यामुळे त्यांच्या उमेदवारीच्या घोषणेनंतर हिंगोली मतदारसंघांमध्ये नाराजीचा सूर उमटलेला आहे व एकंदरीतच नाराजीचा नारळ फुटला आहे असे म्हटले जात आहे. भाजपाकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांनी गेल्या अडीच वर्षांपासून या मतदारसंघात जनसंपर्क चांगल्या पद्धतीने वाढविलेला आहे याच बळावर भाजपाकडून हिंगोलीच्या जागेवर दावा केला जात आहे आमदार तानाजी मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली भाजपाचे किनवटचे आमदार भीमराव के राम तसेच उमरखेडचे आमदार आणि प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन हिंगोलीच्या जागेवर आपला दावा सांगणार असल्याचे समजते एकंदरीतच हिंगोलीच्या जागेवर आता उमेदवार बदलण्याच्या हालचाली सुरू असल्याचे समजते.

# महाकाली यात्रा नियोजनाबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्याची आराध्य दैवत म्हणून ओळख असलेल्या माता महाकाली यात्रेला १४ एप्रिलपासून सुरवात होणार आहे. यासंदर्भात करावयाच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला.बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपविभागीय अधिकारी संजय पवार, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, अतिरिक्त आयुक्त मंगेश खवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटरे, वाहतूक निरीक्षक प्रवीणकुमार पाटील आदी उपस्थित होते.

महाकाली यात्रेला आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, गर्दी व्यवस्थापनासाठी मंदिराच्या विश्वस्त मंडळाने जास्तीत जास्त स्वयंसेवक ठेवावे. भाविकांचा प्रवेश आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी. मंदिराच्या परिसरात दोन मतदान केंद्र असल्यामुळे मतदानाच्या अगोदरचा आणि मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात येण्यास बंदी राहणार आहे. याबाबत भाविकांना सूचना देण्यात याव्या. अन्न व औषध प्रशासन विभागाने प्रसाद, आहारपदार्थांची स्वतंत्र टीम द्वारे तपासणी करावी. निवडणुकीचा कालावधी असल्यामुळे स्वयंसेवकांना ओळखपत्र द्यावे. कोणतीही दुर्घटना होणार नाही, याची काळजी घ्यावी.

यात्रेदरम्यान वैद्यकीय व्यवस्था चोख ठेवावी तसेच पुरेसे आरोग्य बुथ लावावे आणि औषधी साठा उपलब्ध ठेवावा. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा




सामान्य रुग्णालय, आपला दवाखाना आणि प्राथमिक आरोग्य केंद्र व इतर वैद्यकीय संस्थांची माहिती प्रसारीत करावी. मंदिर परिसरात नियंत्रण कक्षाची स्थापन करून यात पोलिस, चंद्रपूर महानगर पालिका आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कर्मचा-यांची ड्युटी लावावी. यात्रेदरम्यान विद्युत पुरवठा खंडीत होता कामा नये. काही दुरुस्तीची कामे असल्यास आताच करून घ्यावी. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करावी. उन्हाचा तडाखा लक्षात घेता बाहेरून येणा-या भाविकांना उष्माघात बाबत घ्यावयाची काळजी, याबाबत परिवहन महामंडळाने बसेस मध्ये पोस्टर लावावले. घनकचरा व्यवस्थापन, शौचालयाची व्यवस्था व त्याची नियमित स्वच्छता महानगर पालिका प्रशासनाने करावी.

सध्या निवडणुकीचा काळ असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता सुरू आहे. या कालावधीत धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांना बंदी नसली तरी अशा उपक्रमाचा राजकीय प्रचारासाठी उपयोग होता कामा नये, याबाबत विश्वस्त मंडळाने दक्षता घ्यावी, अशाही सुचना जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी दिल्या.

### मनोरुग्ण,निराधारांच्या सेवेसाठी परमेश्वराची चंद्रपूरात शोधमोहीम

# सहा मनोरुग्णांची केली नोंद;लवकरच नांदेडच्या निवारा गृहात करणार व्यवस्था

**तळोधी (बा ) । प्रणय बांगरे**

मनोरुग्ण,वेडया अनाथ लोकांकडे फारसे कुणी ढुंकूनही बघत नाही.अशा या मनोरुग्णांना स्वतःच्या गावातच हक्काचा निवारा मिळावा.म्हणून सतत झटत आहे.आणि छत्रपती शिवाजी महाराज निवारा गृहाची इमारत होण्याअगोदर किरायाच्या मकान मध्ये सदर मनोरुग्ण, निराधार,वेड्या लोकांना राहण्यासाठी सोय करण्यात येणार आहे.यासाठी परमेश्वर मडावी हया सेवाधारी तरुणाने डोमाजी आधार फाउंडेशन द्वारा थेट चंद्रपूर शहरात दि.२८ मार्च ते ३१ मार्च प्रयन्त शोध मोहीम सुरु केली होती.या शोध मोहिमेमध्ये त्यांनी ६ मनोरुग्ण,वेडे बेवारस,अनाथ,निराधार लोकांची नोंद केली आहे.आणि शोध मोहिमेदरम्यान त्यांची कटिंग-दाढी,आंघोळ,नवे वस्त्र,जेवण व औषध उपचार करून घेतला आहे.

दि.२८ ते ३१ मार्च प्रयन्त सतत ४ दिवस



चंद्रपूर व भद्रावती तालुक्यातील मनोरुग्ण,अनाथ,निराधार लोकांची शोधमोहीम परमेश्वर मडावी व त्यांचे सहकारी भोजराज चौके,राहूल मडावी, अविनाश सहारे, रोहीत मडावी, यश रामटेके, पितांबर खामदेवे यांची डोमाजी आधार फाउंडेशन च्या माध्यमातून शोध मोहीम सुरु होती. यामध्ये त्यांना ६ मनोरुग्ण व निराधार मिळाले.त्यांची कटिंग-दाढी, आंघोळ,नवे वस्त्र, जेवण व औषध उपचार करून घेतला आहे.दरम्यान लवकरच त्यांना नागभीड तालुक्यातील नांदेड येथील परमेश्वर मडावी यांच्या स्व गावी छत्रपती शिवाजी महाराज निवारा गृहात कायमस्वरूपी राहण्याची सोय होणार आहे.सध्यस्थितीत किरायाच्या इमारती मध्ये सदर निवारा गृह सुरु करण्यात येणार असल्याची माहिती परमेश्वर मडावी यांनी दिली.

**आमदार किशोर जोरगेवार यांनी केला सत्कार.**

चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांनी डोमाजी आधार फाउंडेशनचे सेवाभावी कार्याने प्रभावित होऊन परमेश्वर मडावी व त्यांच्या सहकाऱ्यांची चार दिवस राहण्याची सोय केली. व परमेश्वर मडावी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.आणि पुढेही सहकार्याचे आश्वासन देत पुढील कार्यासाठी फाउंडेशला शुभेच्छा दिल्या.

# डॉ.आईंचवार व डॉ.पोटदुखे यांचा भाजपात प्रवेश





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाचे माजी कुलगुरू, श्री कन्यका नागरी सहकारी बँकेचे विद्यमान अध्यक्ष आणि सरदार पटेल मेमोरियल ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्राचार्य विजयराव आईंचवार तसेच, राजीव गांधी अभियांत्रिकी कॉलेज चंद्रपूरचे प्राचार्य डॉ. प्रवीण पोटदुखे यांनी बुधवार, ३ एप्रिल रोजी राज्याचे वन, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघाचे भाजपा, राष्ट्रवादी आणि शिवसेना, मित्र पक्षाचे अधिकृत उमेदवार ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

ना. सुधीर मुनगंटीवार यांची विकासात्मक दृष्टी आणि झंझावाती कार्यशैलीवर विश्वास ठेवून मागील चार-पाच दिवसात इतर पक्षांच्या हजारो कार्यकर्त्यांनी भाजपात प्रवेश केला असून त्यामुळे भाजपाची चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघातील ताकद वाढली आहे.

हॉटेल तिरुपती क्राऊन येथे आयोजित शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी बैठकीत डॉ. आईंचवार व डॉ. पोटदुखे यांनी भाजपात प्रवेश घेतला. लोकसभा निवडणुकीत ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या विजयाकरीता पूर्ण शक्तिनिशी आपण प्रयत्न करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# इंडियन मिलिटरी स्कूलची विज्ञान प्रतिकृती आता राज्यस्तरावर झळकणार




**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानीय इंडियन मिलिटरी स्कूल पुलगावची विज्ञान प्रतिकृती ची राज्यस्तरावर निवड झाली.

दिनांक ३१ मार्च ते २ एप्रिल २०२४ ला इन्स्पायर अवार्ड जिल्हास्तरीय प्रदर्शनी सेंट पॉल हायस्कूल चिकना नागपूर येथे संपन्न झाली . वर्धा जिल्ह्यामधून एकूण ३१ सभासदांनी सहभाग नोंदविला होता. या प्रदर्शनी मध्ये एकूण ५ जिल्ह्यांचा समावेश असून २२० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव येथील वर्ग दहावीचा विद्यार्थी आदित्य विजय ढोले या विद्यार्थ्यांची विज्ञान प्रतिकृती राज्यस्तरावर निवड करण्यात आली आदित्यने या यशाचे श्रेय मार्गदर्शक विज्ञान शिक्षिका अर्चना जगताप तसेच सर्व विज्ञान शिक्षक वर्गाला दिले. शाळेचे कमांडर कर्नल के एच पाटील शाळेचे मुख्याध्यापक रविकिरण भोजने ,शाळेचे पर्यवेक्षक नितीन कोठे यांनी आदित्य व विज्ञान मार्गदर्शक शिक्षिका अर्चना जगताप यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे विशेष अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष मनोज भेंडे, सचिव कृष्णा कडू यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच राज्यस्तरासाठी शुभेच्छा दिल्या.

# ही लोकसभा निवडणूक देशाच्या विकासासाठी-सुधीर मुनगंटीवार

### राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्ता बैठक संपन्न



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

ही लोकसभा निवडणूक केवळ तुमची,माझी किंवा कुटुंबाची नसून तर ही निवडणूक देशाच्या विकासासाठी असल्याचे प्रतिपादन चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदार संघाचे भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी व मित्र पक्ष महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

चंद्रपूर येथे मंगळवार, २ एप्रिल रोजी राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. त्या बैठकीला ते संबोधित करत होते. बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकार, भाजपा महानगराचे जिल्हाध्यक्ष राहुल पावडे यांच्यासह भाजपा,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.महायुतीमधील सर्व पक्षांसोबत आपण कायमच योग्य सन्मान ठेऊन समन्वयाने वागलो असल्याने सर्व नेत्यांशी आपले संबंध चांगले असल्याचे मुनगंटीवार म्हणाले. विरोधीपक्ष नेते असो किंवा अपक्ष नेते असो विकास कामांना आपण कायम प्राथमिकतेवर केल्याचे ते म्हणाले. अजितदादा पवार यांनी देखील ही निवडणूक विकासाची असल्याचे घोषित केले आहे. त्यामुळे एक ध्येय ठेऊन स्थानीक स्वराज्य संस्था, नगरपालिका या स्तरावरचे आपल्या एकत्रित अनुभवाचा फायदा एकमेकांना होईल, असे बघितले पाहिजे. ही युती दीर्घकालीन टिकली पाहिजे, असे ते म्हणाले.

# अमरावतीच्या निवडणुकीत १७ रुपयांची साडी चर्चेत

**अमरावती (वृत्तसंस्था):**ज्या किमतीत हातरुमाल मिळत नाही, त्या १७ रुपये किमतीत खरेच साडी मिळू शकेल का, हा प्रश्न कुणालाही पडू शकेल. नवनीत राणा यांनी मतदारांना १७ रुपये किमतीच्या साड्या वाटल्या, परंतु या साड्यांमुळे येथील लोकांचे मतपरिवर्तन होणार नाही, असा दावा आमदार बच्चू कडू यांनी केला, त्यामुळे हा मुद्दा चांगलाच चर्चेत आला आहे.अमरावती लोकसभा मतदार संघात प्रचारादरम्यान आरोप-प्रत्यारोपांनी वातावरण तापले आहे. भाजपने नवनीत राणा यांना उमेदवारी दिली आहे. पण, महायुतीत असलेल्या आमदार बच्चू कडू यांनी मात्र त्यांच्या पक्षातर्फे दिनेश बुब यांना त्यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात उतरवले आहे. कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना बच्चू कडू यांनी नवनीत राणा यांना टोला लगावला. दोन कोटींच्या वाहनातून फिरायचे आणि १७ रुपयांची साडी वाटायची, हे बरे नव्हे असे सांगत साडी वाटप करून लोकांना गुलामीकडे नेण्याची व्यवस्था तोडून टाका, हे आवाहन बच्चू कडूंनी केले.दरवर्षी मेळघाटात होळी सणाच्या निमित्ताने नवनीत राणा यांच्याकडून आदिवासी महिलांना साडी वाटप, किराणा वाटप केले जाते. ते यावर्षीही करण्यात आले. पण काही गावांमध्ये निकृष्ट दर्जाच्या आणि पारदर्शी कापड असलेल्या साड्यांचे वाटप करण्यात आल्याच्या तक्रारी समोर आल्या. नेमका हाच धागा पकडून बच्चू कडूंनी नवनीत राणांवर टीका केली.सुरतमधील घाऊक बाजारातून मोठ्या संख्येन साड्या खरेदी केल्यास त्या अत्यंत कमी किमतीत उपलब्ध होऊ शकतात. घरगुती वापराच्या साड्या या तीस ते चाळीस रुपयांमध्ये या ठिकाणी मिळतात, असे स्थानिक कापड व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा हे दरवर्षी दिवाळी सणाच्या निमित्ताने किराणा वाटप करतात. होळीच्या सणाच्या निमित्ताने साडी वाटप केले जाते. जाहीरपणे सर्वकाही केले जाते. त्यांच्या दातृत्वाची चर्चा समाजमाध्यमांवर रंगते. यंदा निवडणुकीचे वर्ष असल्याने हळदी-कुंकू कार्यक्रमातूनही हे दान दिसले. विरोधकांनी त्याविषयी टीका केली. पण या टीकेची पर्वा राणा यांच समर्थक करीत नाहीत. इतर कुणा नेत्यांमध्ये ही दानत आहे का, असा उलट सवाल ते करतात.

# 'त्या' दिव्यांगानी तहसीलदार व संवर्ग विकास अधिकाऱ्यांना दिले निवेदन

## प्रहार दिव्यांगमंच तळोधी (बा) व दिव्यांग सेवा संघर्ष मंडाळाची मांगणी

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभिड तालुक्यातील दिव्यांग बांधवाना अंत्योदय शिधापत्रिका ,५% दिव्यांग निधी वितरण ,५०% मालमत्ता करात सवलत, रोहयो च्या कामावर दिव्यांगाणा घेण्यात यावे अशी मागणी आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था संलग्नीत प्रहार दिव्यांगमचं तळोधी (बा )व परिसर संघटना आणि दिव्यांग सेवा संघर्ष जनपरिसर संघटना मिंडाळा ने केली असून, या बाबतचे निवेदन दिनांक २ एप्रिल ला तहसिलदार आणि संवर्ग विकास अधिकारी नागभिड यांना सादर केले आहे.

भारतात साधारण २.२१टक्के लोकसंख्या दिव्यांग व्यक्तीची आहे. मात्र जागतिक मानंका नुसार हे प्रमाण ८ते १० टक्यापर्यंत असावे.शासनाच्या विविध योजना असल्या तरी शासनस्तरारून अमलबजावणी न झाल्यामुळे मात्र गरजु व पात्र दिव्यांग लाभार्थी वंचित राहतात.

महाराष्ट्र शासनाच्या अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग अंतर्गत दिनांक २१ डीसेंबर २०२०च्या शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तींना अंत्योदय योजनेत समाविष्ट करून दिव्यांग व्यक्तींना सरसकट व तात्काळ लाभ देण्यात यावा असे निवेदन प्रहार दिव्यांग मंच आणि दिव्यांग सेवा संगर्ष संघटनेच्या वतीने तहसिलदार मनोज रामटेके यांना दिले आहे.दिव्यांगाची शिक्षण, आर्थिक व रोजगाराची स्थिती अंत्यत हलाकीची व बिकट आहे. दिव्यांगात बेरोजगारीचे प्रमाण भरपुर आहे. दिव्यांगतवामुळे विवंचना व अभाव असलेल्या दिव्यांग बांधवाना खऱ्या अर्थाने सक्षम करणे गरजेचे आहे.

शासन निर्णय २५जुन २०१४व २५.ऑकटो.२०१५ अन्वये अनुक्रमांक ९ मधील सुचनेनुसार दिव्यांग लाभार्त्यांना ग्रामपंचायत स्तरावरील ऐकून उत्पन्नातून ५%निधीचे वितरण थेट दिव्यांग लाभार्थ्यांच्या खात्यावरती जमा करावे,आणि कुटुंब प्रमुखांची अट न लावता मालमता करामध्ये ५०%सवलत देण्यात यावी तसेच दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या क्षमतेनुसार रोजगार हमी योजनेच्या कामावर घ्यावे ह्या मागण्याचे निवेदन संवर्ग गटविकास अधिकारी अक्षय जे. सुक्रे यांना देण्यात आले आहे.ही संघटना दिव्यांग व्यक्तीच्या विविध अधिकारावर काम करत असुन शासकीय योजना दिव्यांग व्यक्तीपर्यंत पोहचविणे, समाजात विखुरलेल्या दिव्यांगव्यक्तींना एकत्र करणे. शासनासोबत सुसंवाद साधने. दिव्यांग व्यक्तीच्या संदर्भात जाणीव जागृती, क्षमतावृधी, दिव्यांगाचे विविध प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे.यावेळी प्रहार दिव्यांगमच चे अध्यक्ष व पत्रकार तुलोपचंद गेडाम, दयालसिंग जुनी, देविदास कन्हाके ,संतोष वाढोणकर, रुपेश मऱ्हसकोले, मायाताई वासनिक,पंचफुला बारसागडे, पुनमकौर जुनी, प्रणय बांगरे, क्रिश वाकडे, सुनिता म्हस्के ,तालुका समन्वयक नितेश नागापुरे, स्वयंसेविका अनिता बावनकर उपस्थित होते.



सह्याद्रीचा राखणदार



# आदिवासींच्या विकासाकरीता एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दिशादर्शक

## लोकसहभागातून ग्रामसभांचा विकास व सक्षमीकरण

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासींचे जीवनमान उंचावणे तसेच आदिवासींचा शाश्वत विकासाकरीता गौण वन उपजांवर आधारित रोजगार निर्मिती करून लोकसहभागातून ग्रामसभांचा विकास व सक्षमीकरण करण्याकरीता गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने एकल: ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

ग्रामसभास्तरावर आदिवासींकरीता शाश्वत उपजीविका निर्माण करणे, जैवविविधता संवर्धनासाठी धोरणांची अंमलबजावणी करणे, वनसंरक्षण, वनसंवर्धन व वन व्यवस्थापन योजनांच्या अंमलबजावणी करीता ग्रामसभांची क्षमता वाढविणे तसेच ग्रामसभांना तांत्रिक सहाय्य करून वनसंवर्धन व वन व्यवस्थापन योजनांचा विकास व अंमलबजावणी करणे हा एकल ग्रामसभा प्रकल्पाचा उद्देश आहे.

गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे आणि तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मीना यांच्या संकल्पनेतून एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना अस्तित्वात आली. सदर संकल्पना प्रत्यक्षात उतरविणे, उद्देशांची पूर्तता करणे व ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरीता जिल्हा प्रशासनाने गोंडवाना विद्यापीठासोबत सामंजस्य करार केला. या करारानुसार गोंडवाना विद्यापीठ नॉलेज पार्टनर म्हणून भूमिका पार पाडत आहे. ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनात, विद्यापीठांतर्गत ग्रामसभा सक्षमीकरण व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात आले आहे. येथील आदिवासींच्या विकासाकरीता एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दिशादर्शक ठरणारे आहे.

वनहक्क कायद्यांतर्गत जिल्ह्यातील एकूण १ हजार १०९ गावांना सामूहिक वनहक्क दावे प्राप्त झाले आहेत. जिल्हा प्रशासनासोबत ६४३ ग्रामसभांचा सामंजस्य करार झाला असून आतापर्यंत एकूण ३६७ ग्रामसभांना तर एकूण १ हजार ८१० ग्रामसभा प्रतिनिधींना प्रशिक्षण देण्यात आले आहे. २१८ सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांची नरेगा पोर्टलवर अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. तर ६२ ग्रामसभेमध्ये नरेगा व मानव विकास योजनेअंतर्गत वनोपजाच्या साठवणुकीकरीता गोडावून उभारणे प्रस्तावित आहे. तसेच सामूहिक वनहक्क प्राप्त ५३ ग्रामसभांचे वनसंवर्धन व व्यवस्थापन आराखडे बनविण्याकरीता मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले आहे. ग्रामसभा सक्षमीकरणाकरीता गोंडवाना विद्यापीठामार्फत ५८ प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले. तसेच १३५ ग्रामसभांचे वनसंवर्धन व व्यवस्थापन आराखडे जिल्हा कन्वर्जन्स समितीकडे सादर करण्यात आले आहे. जिल्हा परिवर्तन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली अंतर्गत ३ एकल सेंटर कार्यान्वित करण्यात आले आहेत, हे या प्रकल्पाचे फलित आहे.

ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील ग्रामसभांचे क्षमता सक्षमीकरण व विकास साधण्याकरीता तसेच ग्रामसभांना प्रशिक्षण देण्याकरीता अभ्यासक्रम तयार करणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा क्षमता सक्षमीकरण अभ्यास मंडळाची निर्मिती करण्यात आली आहे.

**अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासाठी अभ्यासगटांची निर्मिती:**

अभ्यास मंडळाची निर्मिती केल्यानंतर अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यासाठी सहा अभ्यास गट तयार करण्यात आले आहे. सदर अभ्यास गटामध्ये आदिवासी क्षेत्राशी संबंधित कायद्यांचा अभ्यास करणारा अभ्यास




गट, या अभ्यास गटात भारतीय वन अधिनियम १९२७, पंचायत राज अधिनियम १९५८, महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४, भूराजस्व संहिता १९६६ प्रमाणे निस्तार हक्क, मनरेगा (१९७६ ते २००५), पेसा कायदा १९९६, जैवविविधता कायदा २००२ ते २००४, सामूहिक वनहक्क कायदा २००६, इत्यादी कायद्यांचा समावेश आहे.

ग्रामसभांचे रेकॉर्ड, हिशोब व अंकेक्षण अभ्यास करणारा गट यामध्ये ग्रामसभाचे रेकॉर्ड व अंकेक्षण तयार केल्या जातात. ग्रामसभेतील संघर्ष निराकरणाचा अभ्यास करणारा गट यामध्ये, ग्रामसभांमध्ये संघर्ष निर्मितीची कारणे तपासणे, ग्रामसभा व शासकीय यंत्रणेतील संघर्ष तसेच वाद निराकरणाचे उपाय यावर अभ्यास केल्या जाते. लागवड, संकलन, साठवणूक, प्रक्रिया व गुणवत्ता नियंत्रणाचा अभ्यास करणारा गट, आणि पाणलोट क्षेत्र आधारित गाव विकासाचा अभ्यास करणारा गट असे विविध गट तयार करण्यात आले आहे.

**एकल: ग्रामसभा प्रशिक्षणाकरीता ग्रामसभांची निवड:**

एकल ग्रामसभा प्रशिक्षणाकरिता ग्रामसभांची निवड जिल्हा प्रशासनाकडून केली जाते. ज्या ग्रामसभांनी जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार केला आहे, अशा ग्रामसभांची निवड प्रशिक्षणाकरिता केली जाते. एका ग्रामसभेतून ग्रामसभेचे अध्यक्ष, सचिव, दोन महिला व एक ग्रामसभा सदस्य अशा एकूण ५ ग्रामसभा सदस्यांची निवड ग्रामसभेद्वारे ग्रामसभेत ठराव घेऊन केली जाते. तसेच निवड झालेल्या ग्रामसभा सदस्यांची प्रशिक्षणाकरिता निवड केली जाते. एकल ग्रामसभा प्रशिक्षण कार्यक्रम दोन टप्प्यात राबविले जाते. पहिल्या सात दिवसाच्या निवासी प्रशिक्षणात ३ दिवस आदिवासी क्षेत्राशी संबंधित कायदे त्यामध्ये, पेसा कायदा, सामूहिक वन हक्क कायदा, जैवविविधता कायदा, रोजगार हमी कायदा आदी कायद्यांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर २ दिवस वनव्यवस्थापन आराखडा तयार करण्याबाबतचे प्रशिक्षण तर शेवटच्या २ दिवसांमध्ये गौण वनउपज, संकलन व व्यवस्थापन आणि ग्रामसभेशी संबंधित रेकॉर्ड व अंकेक्षण याबाबतचे प्रशिक्षण दिले जाते.एकल ग्रामसभा प्रशिक्षणाच्या सुरवातीला प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता ४ ते ५ ट्रेनर होते. यामध्ये, डॉ. देवाजी तोफा, डॉ.मोहन हिराबाई हिरालाल, डॉ. सतीश गोगुलवार, श्री. केशव गुरनुले, डॉ. रुपेंद्रकुमार गौर, डॉ.कुदंन दुपारे आदी मास्टर ट्रेनर होते. त्यासोबतच, ग्रामसभांचे प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभा मधून सहयोगी मित्र म्हणून १२९ तरुण-तरुणींची निवड करण्यात असून यामध्ये आदिवासी क्षेत्राशी संबंधित कायदे, वन व्यवस्थापन, जैवविविधता, गौण वनउपज संकलन, विपणन, वन व्यवस्थापन आराखडा, ग्रामसभांचे अंकेक्षण व रेकॉर्ड आदींचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण प्राप्त ग्रामसभा रोजगार हमी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी करून रोजगार हमी योजनेअंतर्गत येणारी कामे ग्रामसभेला मिळतात, त्यामुळे रोजगारासाठी होणारे स्थलांतरण कमी झाले आहे. सोबतच पुढील दहा वर्षाकरीता वनव्यवस्थापन व संरक्षण आराखडा सहयोगी मित्रांच्या मदतीने ग्रामसभा तयार करून जिल्हा कन्वर्जन्स समितीकडे सादर करतात. त्यामुळे ग्रामसभेला मिळालेल्या सामूहिक वनहक्कांचे व जंगलाचे संरक्षण आणि संवर्धन होण्यास मदत होत आहे.आदिवासी भागांसाठी पेसा, सामूहिक वन हक्क यासारख्या कायद्याची निर्मिती झाली. या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे आदिवासींसाठी बनलेल्या कायद्यांची जाणीवजागृती झाल्यामुळे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत होत आहे.

**एकल सेंटर अंतर्गत विविध टप्प्यात प्रकल्पाची अंमलबजावणी:**

ग्रामसभांना जिल्हा प्रशासनासोबत सामंजस्य करार करून जोडणे. गोंडवाना विद्यापीठाच्या सहाय्याने सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांचे कायदा, व्यवस्थापन, लेखेजोखे याबाबत प्रशिक्षण देणे. सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांचे वनसंवर्धन व व्यवस्थापन आराखडे बनविण्याकरीता मार्गदर्शन करणे. ग्रामसभांच्या सक्षमीकरणाकरीता तसेच त्यांच्या गौण वनोपजांना प्रक्रिया व बाजारपेठ उपलब्ध करून देण्याकरीता मदत करणे. गौण वनोपजाच्या साठवणुकीकरीता ग्रामसभेमार्फत गोडाऊन उभारणे. सामूहिक वनहक्क प्राप्त ग्रामसभांना नरेगा अंमलबजावणी यंत्रणा म्हणून नोंदणी आणि कामाचे नियोजन करणे. विविध शासकीय योजनांना एक केंद्रित करून ग्रामसभांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आदी टप्प्यांमध्ये एकल सेंटर अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येते.

# ७ एप्रिल रोजी राज्यस्तरीय पात्रता (सेट) परीक्षेचे आयोजन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या वतीने राज्यस्तरीय पात्रता चाचणी परीक्षेचे (सेट) आयोजन रविवार, दि. ७ एप्रिल २०२४ रोजी गोंडवाना विद्यापीठातंर्गत विविध परीक्षा केंद्रावर करण्यात आले आहे.

विद्यापीठाअंतर्गत शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली, महिला महाविद्यालय, शासकीय विज्ञान महाविद्यालय, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली, शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय, समाजकार्य महाविद्यालय, गडचिरोली या ६ परीक्षा केंद्रावर परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. गोंडवाना विद्यापीठाच्या सेट परीक्षा कक्षाद्वारे एकूण १६७० विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

सेट परीक्षा ही गोंडवाना विद्यापीठातर्फे २०१२ पासून सुव्यवस्थितपणे पार पाडण्यात येत असून दोन सत्रांमध्ये ही परीक्षा होणार आहे. पहिला पेपर सकाळी १० ते ११ वाजताच्या कालावधीत तर दुसरा पेपर सकाळी ११:३० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत असणार आहे.विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावरून उपलब्ध करून घ्यावे. परीक्षा केंद्रावर मोबाईल, कॅल्क्युलेटर किंवा लॉगटेबल आणू नये. तसेच दिलेल्या वेळेच्या ३० मिनिटे अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे. विद्यापीठाने दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करुन शांततामय वातावरणात परीक्षा पार पडेल याची खबरदारी घ्यावी, असे गोंडवाना विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता तथा सेट परीक्षा समन्वयक डॉ. अनिल चिताडे यांनी कळविले आहे.

# स्वीप अंतर्गत युवा मतदारांकरीता रिल्स,पोस्टर्स व मिम्स स्पर्धा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक २०२४ करीता १३ - चंद्रपूर लोकसभा मतदार संघात १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीत सर्व स्तरातील, वयोगटातील मतदारांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे व नवमतदार म्हणजेच युवा वर्गाचा यात सहभाग वाढावा, यादृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे 'माय व्होट इज माय फ्युचर : पावर ऑफ वन व्होट' या थीमवर रिल्स, पोस्टर्स मेकींग व मिम्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

लोकशाहीमध्ये मतदानाला अत्यंत महत्व आहे. देशाच्या प्रगतीसाठी, ध्येयधोरणे ठरविण्यासाठी तसेच दिशा देण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकांनी मतदान करायलाच हवे. याचाच एक भाग म्हणून स्वीप अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येतात. १३ - चंद्रपूर लोकसभा मतदार संघात १९ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार असून सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करता येईल. १८ वर्षांवरील प्रथम मतदार मोठ्या संख्येने असल्याने व युवकांमध्ये रिल्स, पोस्टर व मिम्सचे विशेष आकर्षण असल्याने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

**विजेत्यांना मिळणार रोख बक्षिस**

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांकरीता विशेष रोख पारितोषिके देण्यात येणार आहे. रिल्स स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकाला प्रथम बक्षीस १५ हजार रुपये, द्वितीय बक्षीस १० हजार तर तृतीय बक्षीस ५ हजार रुपये दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे पोस्टर्स स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५ हजार, द्वितीय ३ हजार तर तृतीय बक्षीस २ हजार रुपये आहे. तसेच मिम्स स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम ५ हजार, द्वितीय ३ हजार तर तृतीय बक्षीस २ हजार रुपये देण्यात येणार आहे.

मतदान करण्याबाबत जनजागृती करून मतदानाची टक्केवारी वाढविणे, यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून नागरीकांनी स्वतः बनविलेले रिल्स, पोस्टर्स व मिम्स् https://forms.gle/uCRyEJkaHiqV5q8T7 या लिंकवर १२ एप्रिल २०२४ पर्यंत अपलोड करून पाठवावे. सदर लिंक जिल्हा प्रशासन व जिल्हा परिषदेच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे. या स्पर्धेत मोठ्या संख्येने भाग घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# उष्माघात टाळण्यासाठी उपाययोजना करा जिल्हाधिकाऱ्यांचे संबंधित यंत्रणेला निर्देश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात उन्हाचा पारा चांगलाच चढला असून गत आठवड्यापासून जिल्ह्याचे तापमान ४० अंशाच्या वर आहे. तसेच एप्रिल आणि मे महिन्यात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे उष्माघात टाळण्यासाठी संबंधित यंत्रणेने आतापासूनच प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिले.

उष्मालाटेच्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची आढावा बैठक बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, मनपा आयुक्त विपील पालीवाल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांच्यासह इतर विभागाचे अधिकारी उपस्थित होते.यावेळी १९ एप्रिल रोजी भर उन्हात आपल्याकडे मतदान होणार आहे, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, मतदान केंद्रावर अधिकारी व कर्मचा-यांसाठी आरोग्य विभागाने ओ.आर.एस. पॅकेटचा पुरवठा करावा. जेणेकरून एखाद्याला आवश्यकता भासली त्वरीत देणे शक्य होईल. तसेच स्थानिक प्रशासनाने प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याची पुरेशी व्यवस्था करावी. मतदानासाठी जाणारे अधिकारी - कर्मचारी आणि पोलिस कर्मचा-यांनासुध्दा उष्माघात टाळण्यासाठी काय करावे आणि काय करू नये, याबाबत पुरेशी माहिती द्यावी. तसेच उन्हापासून बचाव करण्यासाठी प्रत्येक नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. गौडा यांनी केले.




**विविध विभागांनी करावयाच्या उपाययोजना :**आरोग्य विभागाने प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात व रुग्णालयांमध्ये कुल वॉर्ड तयार करावे. उष्माघात बाधित व्यक्तीच्या उपचारासाठी औषधाचा मुबलक साठा उपलब्ध ठेवावा. सर्व दवाखाने/इमारतींचे आग सुरक्षा परिक्षण करून घ्यावे. आय.व्ही फ्लूईड, आईस पॅक व ओआरएस उपलब्ध करून ठेवावे. जिल्हा उद्योग केंद्राने भट्टीशी संबंधित कारखाने / व्यवसायामध्ये काम करणा-या कामगारांच्या कामाचे नियोजन व नियमन करण्यासाठी संबंधितांना सुचना द्याव्यात. शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य) यांनी शाळांचे वेळापत्रक सकाळच्या सत्रात करून घेणे तसच शाळांमध्ये पिण्याचे पाणी, पंखे, प्रथमोपचार इत्यादी प्राथमिक सुविधा उपलब्ध राहतील, याची खात्री करावी.

उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी मनरेगा / नरेगा अंतर्गत मजुरांना दुपारच्या सत्रात विश्रांती देऊन त्यांच्या सोयीनुसार सकाळ अथवा संध्याकाळच्या सत्रात कामे वाटून देणे. वन विभागाने वन्यप्राण्यांसाठी पाणतळे निर्माण करणे, वनवा प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी सर्व बाजार समित्या, सहकारी कारखाने, सहकारी संस्था, आदी ठिकाणी पाण्याची व प्राथमिक सुविधा उपलब्ध असल्याची खात्री करावी. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने ग्रामीण व शहरी भागात पुरेसा व स्वच्छ पाण्याचा पुरवठा होईल, याची दक्षता घ्यावी.

**उष्माघात टाळण्यासाठी नागरिकांनी काय करावे :** तहान लागली नसली तरी सुद्धा जास्तीत जास्त पाणी प्यावे. हलकी, पातळ व सछिद्र सुती कपडे वापरावे. बाहेर जाताना गॉगल, छत्री, टोपी, बूट व चप्पलचा वापर करावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत न्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर. एस., घरी बनवलेली लस्सी, तोरणी, लिंबू पाणी, ताक इत्यादीचा वापर करावा.

अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा चटका बसण्याची चिन्हे ओळखावी व चक्कर येत असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. गुरांना छावणीत ठेवण्यात यावे, तसेच त्यांना पुरेसे पाणी द्यावे. घर थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा, तसेच रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. सूर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करावे. पहाटेच्या वेळी जास्त जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असताना मध्ये मध्ये ब्रेक घेऊन नियमित आराम करावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिकची काळजी घेण्यात यावी. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावे. जागोजागी पाणपोईची सुविधा करण्यात यावी.

**काय करू नये :** लहान मुले व पाळीव प्राण्यांना बंद असलेले व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालू नये. बाहेरील तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावी व उन्हात अतिकष्टाची कामे करू नये. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेट थंड पेय घेऊ नये.

# रील पेक्षा रियल मध्ये विकास करणारा खासदार आपल्याला दिल्लीत पाठवायचा आहे-आ.जगताप




**अहिल्यानगर**-रील पेक्षा रियल मध्ये विकास करणाऱ्या खासदाराला आपल्याला संसदेत पाठवायचे आहे.अशा शब्दांत आमदार संग्राम जगताप यांनी महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांचे कौतुक केले. डॉ.सुजय विखे पाटील यांना समर्थन दाखवण्यासाठी राष्ट्रवादीच्या आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी आमदार संग्राम जगताप यांनी सुजय विखे पाटील आणि त्यांनी केलेल्या विकासकामांची चित्रफीत दाखवत जनतेला केवळ विकासासाठी मत देण्याचे आवाहन केले. तर काही लोक केवळ रील मध्ये विकास करण्याचा दावा करतात असा टोलाही त्यांनी विरोधकांना लगावला. राष्ट्रवादी अजितदादा पवार आणि भाजपची युती असल्याने महायुतीच्या उमेदवाराला मोठया मताधिक्याने निवडून आणण्याची जबाबदारी राष्ट्रवादीच्या प्रत्येक कार्यकर्त्याची असल्याचे त्यांनी सांगत सुजय विखे पाटील यांच्यासाठी काम करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केले. तसेच सुजय विखे आणि आपण नगर जिल्ह्याच्या विकासाचा रोड मॅप तयार केला असून लवकरच तो लोकांसमोर आणू असेही ते यावेळी म्हणाले. सदरची निवडणूक देशासाठी असून देशाबरोबर नगरचा निकाल सुद्धा विक्रमी असेल असे त्यांनी आश्वासन दिले. तर डॉ. सुजय विखे पाटील यांनी मागील निवडणुकीत आम्ही एकमेकांच्या विरोधात लढलो. पण आज युतीच्या माध्यमातून संग्राम जगताप यांनी जे सहकार्य दाखवले ते मोठ्या कौतुकाचे असून त्यांचे आभार व्यक्त केले. येणाऱ्या काळात आमदार संग्राम जगताप यांच्या खांद्याला खांदा लावून आपण नगर जिल्ह्याचा कायापालट करू, महिलांची सुरक्षा, तरुणांच्या हाताला काम, गरिबांना स्वस्त दरात घरे, वाहतुकीच्या सुविधा अशा विविध विकास कामांच्या बाबतीत आम्ही चर्चा केली असून लवकरच एक आदर्श जिल्हा म्हणून आम्ही दोघे नावारुपास आणू असे आश्वासन विखे पाटील यांनी आपल्या भाषणातून दिले. लोकांच्या विश्वासाला कधीच तडा जाणार नाही यामुळे तुम्ही फक्त माझा विकास पाहून मला मतदान करा असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .